महाराष्ट्र शासन

# मत्स्यव्यवसाय विभाग

तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४००००२

दूरध्वनी क्र. २२८२१२३९, फॅक्स क्र. २२८२२३१२

Web site: http//fisheries.maharashtra.gov.in Email : commfishmaha@gmail.com

क्रमांक : मत्स्य/प्रशा/१४११०१/२८/२०२१ दिनांक : २६.०७.२०२१

**प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना (PMMSY) आणि विभागाच्या इतर केंद्र पुरस्कृत योजना प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयात मराठी/हिंदी/इंग्रजी या तीनही भाषांवर प्रभुत्व असलेले अनुवादक-०१ पद करार पद्धतीने घेण्याकरिता जाहिरात नमुना**

अर्ज आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयास सादर करण्याचा शेवटचा दिनांक : २०.०८.२०२१

**अर्ज मागविणाऱ्या कार्यालयाचे नाव :**

आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, तारापोरवाला मत्स्यालय, १ ला मजला, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई-४००००२

| Sr. No. | Designation | No. of Posts | Consolidated Remuneration per month (Rs.) | Qualification |
|---|---|---|---|---|
| 1. | मराठी/हिंदी/इंग्रजी या तीनही भाषांवर प्रभुत्व असलेले अनुवादक | 01 | Up to Rs. 25,000/- per month | १. कला शाखेमधून इंग्रजी व मराठी या दोन भाषा घेऊन पदव्युत्तर पदवी/पदवीधारक, २. मराठी आणि इंग्रजी या दोन भाषांवर प्रभुत्व आवश्यक, ३. शासकीय कार्यालयीन भाषाशैली आणि पत्रव्यवहार याबाबतचा अनुभव आवश्यक, ४. सेवानिवृत्त शासकीय अनुवादक असल्यास प्राधान्य. |

**Role and responsibilities :**

१. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेच्या मार्गदर्शक सूचना, इंग्रजी/मराठी/हिंदी प्रचार साहित्य आवश्यकतेप्रमाणे इंग्रजी/मराठी/ हिंदी या भाषांमध्ये अनुवाद करून देणे.

२. राज्य शासनाची शासकीय कार्यालयीन भाषाशैली आणि पत्रव्यवहाराचा नमुना विचारात घेऊन पत्रव्यवहार अनुवादित करून देणे.

**अटी व शर्ती :**

१) सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त ०६ महिन्यांसाठी अशा नियुक्तीचे प्रत्येक महिन्यात केलेल्या कामाचा आढावा घेऊन कामाच्या गुणवत्तेनुसार वाढीव कालावधीकरिता नूतनीकरण करता येईल आणि एकुण कालावधी आर्थिक वर्ष सन २०२१-२२ म्हणजेच मार्च, २०२२ पेक्षा जास्त असणार नाही.

२) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे नियुक्तीचा कालावधी माहे मार्च, २०२२ मध्ये संपल्यानंतर संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/ सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

३) नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसे बंधपत्र/हमीपत्र सादर करणे अनिवार्य असेल.

४) नियुक्ती प्राधिकारी तथा आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

५) सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात संबंधित अधिकारी/कर्मचारी गुंतलेला नसावा.

६) अशा अधिकारी/कर्मचारी यांनी conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

७) करार पद्धतीवरील अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक असेल.

८) उमेदवार संबंधित अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणतीही रजा घेणार नाहीत.

सही/-

**(डॉ. अतुल पाटणे भाप्रसे)**

आयुक्त मत्स्यव्यवसाय,

महाराष्ट्र राज्य, मुंबई

डीजीआयपीआर-२०२१-२२/१२९८